




दैनिक

# अक्षराज

अचूक वेध, अचूक बातमी

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : १२३
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.com
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, रविवार, दि.१५ डिसेंबर २०२४


## 'आधार'च्या मदतीने तेलंगणामधील नातेवाईकांचा शोध



**अक्षराज : प्रतिनिधी**
**दि.१४, बुलडाणा :** मध्यरात्री बसस्थानक वर एकटीच असलेल्या महिलेची रात्रीच्या गस्तीवरील पोलिसांनी चौकशी केली. मात्र भाषेची अडचण आल्याने तिची माहिती काढणे तर दूरच संभाषण करणेही अशक्य ठरले. सुदैवाने 'त्या' महिले जवळ असलेल्या आधार कार्ड वरून पोलिसांनी शोध घेत तिला तिच्या नातेवाईकांच्या स्वाधीन केले.मेहकर शहर परिसरात काल १२ डिसेंबर रोजी हा घटनाक्रम घडला. मेहकर पोलिसांनी मानवीय भूमिकेतून सतत प्रयत्न करीत 'त्या' महिलेला तेलंगणा राज्यातील नातेवाईकांच्या स्वाधीन केले. यानंतरच पोलिसांनी सुटकेचा श्वास घेतला. या घटनाक्रमाची पार्श्वभूमी देखील तेवढीच रंजक आहे.


**असा आहे घटनाक्रम...**

मेहकर पोलीस ठाण्याचे पोलीस हवालदार सुखदेव ठाकरे आणि जमादार शिवानंद तांबेकर हे १२ डिसेंबर रोजी रात्रीची गस्त घालत होते.मध्यरात्री १ वाजताच्या सुमारास ते मेहकर बस स्थानक येथे पाहणी करीत असताना त्यांना एक महिला थंडीत काकडत एकटीच बसल्याचे दिसून आले.त्यांनी तिची चौकशी केल्यावर ती तेलगू भाषेत उत्तर देत होती. तिला मराठी, हिंदी, इंग्रजी समजत नसल्याने व पोलिसांना तिची भाषा समजत नसल्याने मोठी अडचण झाली. या दोघा कर्मचाऱ्यांनी याची माहिती ठाणेदार भाऊराव घुगे यांना दिली. तसेच रात्रपाळी वर असलेल्या महिला पोलीस सोफिया पठाण यांना घटनास्थळी पाचारण करण्यात आले.मात्र त्यांनाही संभाषण करता आले नाही.

**'आधार'चा आधार!**

दरम्यान सुरक्षिततेच्या दृष्टीने त्या महिलेला मेहकर पोलीस ठाण्यात आणण्यात आले. तेथील महिला कक्षात पोलीस सोफिया पठाण, राणी जमादार, करीम शाह यांनी पुन्हा तिची चौकशी करण्याचा असफल प्रयत्न केला. मात्र याने हार ना मानता पोलिसांनी तिच्या जवळील थैलीची तपासणी केली असता त्यात त्या महिलेचे आधार कार्ड सापडले. त्यावर त्या महिलेचे नाव शोभा यल्लमा महिलाआरम (३३, करमपेल्ली , निजामाबाद) आणि ती तेलंगणा राज्याची रहिवासी असल्याचे निष्पन्न झाले. आधार कार्ड वर मोबाईल क्रमांक देखील होता. त्या मोबाईल वरून महिलेच्या नातेवाईकांशी हवालदार राजेश जाधव, शिवानंद केदार यांनी संपर्क साधत महिला सुखरूप असल्याचे सांगितले. दरम्यान १२ तारखेला रात्री उशिरा महिलेचे नातेवाईक खाजगी वाहनाने मेहकर येथे आल्यावर खात्री पटल्यावर शोभा यल्लमा हिला त्यांच्या स्वाधीन करण्यात आले. यावेळी त्या सर्वांनी मेहकर पोलिसांचे आभार मानत निरोप घेतला तेंव्हा सर्वांचे डोळे आनंदाश्रूने ओले झाले होते

## चिखलीत पिसाळलेल्या कुत्र्याचा हैदोस
## ३० जणांना चावा !



**अक्षराज : प्रतिनिधी**
**दि.१४, बुलडाणा :** बुलढाणा जिल्ह्यातील चिखली शहरात पिसाळलेल्या कुत्र्याने हैदोस घातला आहे. या कुत्र्याने अनेकांना चावा घेतल्याने शहरवासीयांत भीती आणि दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

प्रामुख्याने चिखली शहरातील आठवडी बाजार, तहसील कार्यालय परिसर आणि राऊतवाडी परिसरात या कुत्र्याने तब्बल ३० नागरिकांना चावा घेतला. तहसिल कार्यालय, आठवडी बाजार हे सार्वजनिकपरिसर दिवसभर गजबजलेले राहतात.यामुळे या पिसाळलेल्या कुत्र्याचा धोका जास्तच वाढला आहे. सध्या अधून मधून असणारे ढगाळ वातावरण कुत्र्याने दंश केलेल्या रुग्णांसाठी जास्त धोकादायक असल्याचे जाणकारांचे म्हणणे आहे. या घटनेमुळे शहरभर खळबळ माजली आहे. प्राप्त माहितीनुसार चिखली येथील शासकीय सामान्य रुग्णालयात कुत्र्याने चावा घेतलेल्या पिडीत रुग्णांवर उपचार सुरू आहे. मात्र यातील आठ ते नऊ रुग्ण गंभीर असल्यामुळे त्यांना बुलढाणा येथील जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचारासाठी पाठविण्यात आले आहे. चिखलीमध्ये या पिसाळलेल्या कुत्र्यामुळे नागरिकांत भीती निर्माण झाली आहे.

**विषेश पथक गठीत !**

चिखली नगरपालिकेचे मुख्य अधिकारी प्रशांत बिडगर यांना याची माहिती मिळताच त्यांनी गंभीर दखल घेतली.तसेच या पिसाळलेल्या कुत्र्याला पकडण्यासाठी पालिका कर्मचाऱ्यांची विशेष चमू तयार केली आहे. हे विशेष पथक राऊत वाडी, आठवडी बाजार, चिखली तहसिल कार्यालय परिसरात त्या कुत्र्याचा शोध घेत आहे.हजारो चिखली शहर वासीयांना या कुत्र्याने सळो की पळो करून सोडले आहे. या पिसाळलेल्या कुत्र्याचा ठावठिकाणा माहीत झालेल्या नागरिकांनी याची माहिती तात्काळ संबधित विशेष पथक अथवा नगरपालिकेला कळवावी असे आवाहन मुख्याध्याधिकारी प्रशांत बंडगर यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# काँग्रेसच्या डोक्यावरचं हे पाप कधीच धुतलं जाणार नाही
# पंतप्रधान मोदींचा हल्लाबोल !



**अक्षराज : वृत्तसंकलन**
**दि.१४, दिल्ली :** संसदेत हिवाळी अधिवेशन सुरु आहे. या अधिवेशनात आज संविधानाच्या ७५ वर्षांच्या गौरवशाली प्रवासानिमित्त दोन दिवस संसदेच्या दोन्ही सभागृहात संविधानावर चर्चा सुरु आहे. आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देखील संसदेतील या चर्चेत सहभाग घेत संविधानावर भाष्य केलं. यावेळी बोलताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गेल्या १० वर्षांत केलेल्या कामाचाही उल्लेख केला. तसेच गेल्या ७५ वर्षांतील महत्वाच्या काही घटनांचाही उल्लेख केला. तसेच १९७५ मध्ये भारतामध्ये आणीबाणी लागू करण्यात आली होती, त्यावरून पंतप्रधान मोदी यांनी काँग्रेसवर जोरदार हल्लाबोल केला. 'काँग्रेसच्या डोक्यावरचं हे पाप कधीच धुतलं जाणार नाही', अशा शब्दांत पंतप्रधान मोदींनी काँग्रेसवर हल्लाबोल केला.

**पंतप्रधान मोदी काय म्हणाले?**

भारतीय राज्यघटना स्वीकारून ७५ वर्षे पूर्ण झाले आहेत. आपल्याकडे २५ वर्षाचं देखील एक महत्व असतं. तसेच ५० वर्षाचं देखील एक महत्व असतं. ६० वर्षाचं देखील एक महत्व असतं. मात्र, आपण जर इतिहासाकडे ओळून पाहिलं तर जेव्हा देश संविधानाचे २५ वर्ष पूर्ण करत होता तेव्हा आपल्या देशात संविधान हटवण्याचा प्रयत्न झाला. भारतामध्ये आणीबाणी लागू करण्यात आली होती. सर्व संविधानिक व्यवस्था नष्ट करण्याचा प्रयत्न करण्यात आला होता. देशाला एकप्रकारे जेलखाना बनवण्यात आलं होतं. सर्वांचे हक्क हिरावून घेतले गेले होते.

प्रेसच्या स्वातंत्र्यावर टाळे लावले गेले. मात्र, काँग्रेसच्या डोक्यावर लागलेलं हे पाप कधीही धुतलं जाणार नाही. जगभरात जेव्हा-जेव्हा लोकशाहीची चर्चा होईल तेव्हा-तेव्हा हे काँग्रेसच्या डोक्यावरचं हे पाप दिसेल, असा हल्लाबोल पंतप्रधान मोदी यांनी केला.

**विविधतेत एकता हीच देशाची ताकद...**

आपल्या देशात विविधतेत एकता आहे हीत भारताची ताकद आहे. मात्र, आपल्या देशातील एकतेवर घाला घालण्याचा प्रयत्न केला गेला होता. मात्र, आपल्याला विविधतेमध्ये एकता आणावी लागेल. भारताची एकता मजबूत करण्यासाठी आपण सातत्याने प्रयत्न करत आहोत. कलम ३७० ही देशाच्या एकात्मतेची भिंत बनली होती. मात्र, कलम ३७० देखील रद्द करण्यात आलं आहे. देशाची एकता हीच आमची प्राथमिकता आहे, असंही पंतप्रधान मोदी यांनी म्हटलं आहे. काँग्रेसच्या एका कुटुंबाने संविधानावर घाला घालण्याचं काम केलं. संविधानावर घाला घालण्यात कोणताही कसूर काँग्रेसच्या एका कुटुंबाने सोडला नाही. कारण ७५ वर्षांपैकी एका कुटुंबाने अनेक वर्ष राज्य केलं. मात्र, देशात काय झालं हे जाणून घेण्याचा अधिकार आपल्या देशातील नागरिकांना आहे, अशी टीका पंतप्रधान मोदी यांनी केली.

## राष्ट्रीय किटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रम, दिल्लीच्या पथकाची आरोग्य शिबिराला भेट

**अक्षराज : जे. के. पोळ**
**दि.१४, नेरूळ (नवी मुंबई) :** महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये हिवताप, डेंग्यू आजाराचा प्रसार रोखण्यासाठी आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्य विभागामार्फत विशेष शिबीरांचे आयोजन केले जात असून या शिबिरांना नागरिकांचा उत्तम प्रतिसाद लाभत आहे. शिबिरांना भेटी दिलेल्या नागरिकांमध्ये हिवताप व डेंग्यू आजारांबाबत प्रभावीपणे जनजागृती करण्यात आली.

राष्ट्रीय किटकजन्य रोगनियंत्रण कार्यक्रम, दिल्ली यांच्या संचालक डॉ. तनु जैन यांनी माँसाहेब मिनाताई ठाकरे रुग्णालय येथे भेट दिली असता हिवताप व डेंग्यू नियंत्रणाबाबत उपाययोजनांची पाहणी केली. त्यांच्यासोबत त्यांचे पथक आणि महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य सेवा, पुणे सहसंचालक डॉ.बबीता कमलापूकर, आरोग्य सेवा मुंबई मंडळ, ठाणे उपसंचालक डॉ.अशोक नांदापुरकर तसेच सहाय्यक संचालक, कोकण भवन डॉ.बाळासाहेब सोनावणे उपस्थित होते.

केंद्रीय पथकाने नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र, इंदिरानगर येथील आजच्या जनजागृती शिबिराला भेट दिली. शिबिरामध्ये घरातील व घराभोवतालील डासोत्पत्ती स्थानांची प्रात्यक्षिके बघून या नाविन्यपूर्ण शिबिराची प्रशंसा केली आणि देशातील इतर राज्यातही अशा प्रकारच्या शिबिरांचे आयोजन व्हावे या उद्देशाने त्याचे पूर्ण व्हिडीओ शूटिंग काढून घेतले.



याप्रमाणे नमुंमपा कार्यक्षेत्रात जास्तीच जास्त नागरिकांपर्यंत पोहचून जनजागृती करण्यासाठी दि.१३ डिसेंबर रोजी २६ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांतर्गत विविध ठिकाणी जाहीर शिबीरांचे आयोजन करण्यात आले होते. सदर शिबिरांकरिता ९९८३ नागरिकांनी भेट दिली असून, १०४० रक्तनमुने घेण्यात आले.

नमुंमपा कार्यक्षेत्रात हिवताप, डेंग्यू आजाराबाबत जनजागृती करण्याकरिता दि.०३ ते १३ डिसेंबर या कालावधीत एकुण ३४२ जाहीर शिबीरांचे आयोजन करण्यात आले असून १४९८२६ नागरिकांनी या शिबिरांचा लाभ घेतला आहे. त्यामध्ये एकूण १३८१४ रक्त नमुने घेण्यात आले आहेत.

सदर शिबिरांमध्ये ॲनॉफीलीस व एडीस डासांची उत्पत्तीस्थाने प्रत्यक्षात दाखवून तसेच डासांच्या अळ्या प्रत्यक्ष दाखवून तसेच पाणी साठवून ठेवलेले ड्रम ओढणी, धोतर किंवा साडीच्या कपड्याने बंदिस्त करणे, त्याबरोबरच घराभोवती व घरांतर्गत असणारी डासोत्पत्ती स्थानांची माहिती करून देणे, पाणी साठविण्याची भांडी व टाक्या बंदिस्त करणे, आठवड्यातून एक दिवस स्वच्छ करुन कोरड्या ठेवणे, भंगार साहित्य, टायर्स नष्ट करणे, छतावरील प्लास्टीक शिट, ताडपत्री यामध्ये पाणी साचू न देणे व ताप येताच त्वरित डॉक्टरांचा सल्ला घेणे याबाबत नागरीकांना प्रोत्साहित करुन आवाहन करण्यात येते.

तरी आरोग्य विभागाच्या कार्यवाहीसोबतच नवी मुंबईकर नागरिकांनी घरातील व घराभोवतालची डासउत्पत्ती स्थाने नष्ट करणे तसेच आपले घर व परिसर स्वच्छ ठेवणे, आजुबाजूचा परिसर, टेरेस वरील भंगार नष्ट करणे आदी बाबींवर लक्ष दिले तर नवी मुंबईत हिवताप, डेंग्यू आजारावर आळा घालणे शक्य होईल असे आवाहन महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या वतीने करण्यात येत आहे.

## दादरमधील हनुमान मंदिराबाबत राज्य सरकारची नेमकी भूमिका काय?

**अक्षराज : प्रतिनिधी**
**दि.१४, दादर (मुंबई) :** गेल्या दोन दिवसांपासून मुंबईच्या राजकीय वर्तुळात दादरमधील हनुमान मंदिराचा मुद्दा चर्चेचा ठरला आहे. खुद्द उद्धव ठाकरेंनी यासंदर्भात पत्रकार परिषद घेऊन मुद्दा उपस्थित केल्यामुळे या मुद्द्यावरून राजकारण तापल्याचं पाहायला मिळालं आहे.

याबाबत सत्ताधारी आणि विरोधी पक्षांकडून आरोप-प्रत्यारोप आणि दावे-प्रतिदावे करण्यात आल्यामुळे या मंदिराचं नेमकं काय होणार? याकडे सगळ्यांचं लक्ष लागलं होतं. अखेर एकीकडे मंगलप्रभात लोढा यांनी मंदिराला आलेली नोटीस स्थगित केल्याचं सांगितलं असताना दुसरीकडे मंदिर नियमितीकरणाबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी मोठं विधान केलं आहे.

**नेमका काय आहे वाद?**




दादर स्थानकावर पुनर्विकासाची कामं करण्याचा प्रकल्प रेल्वे प्रशासनाकडून हाती घेण्यात आला आहे. त्यायचाच एक भाग म्हणून मध्य रेल्वेवरील दादर स्थानकाच्या पूर्वेकडे असणारं जवळपास ८० वर्षं जुनं हनुमान मंदिर हटवण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यासाठी मंदिर प्रशासनाला रेल्वेकडून नोटीस बजावण्यात आली. मात्र, याला स्थानिकांबरोबरच राजकीय विरोधकांनीही तीव्र विरोध केला. उद्धव ठाकरेंनी पत्रकार परिषद घेऊन या नोटिशीबद्दल सत्ताधाऱ्यांवर परखड शब्दांत टीका केली.

**नोटिशीला स्थगिती**

दरम्यान, नोटिशीचा मुद्दा तापल्यानंतर भाजपा आमदार मंगलप्रभात लोढा यांनी नोटिशीला रेल्वेकडून स्थगिती देण्यात आल्याची माहिती माध्यमांना दिली. तसेच, गेल्या दोन दिवसांपासून रेल्वे प्रशासनाच्या अधिकाऱ्यांशी याबाबत संपर्कात असून मंदिराशी संबंधित कागदपत्रांची तपासणी केल्यानंतर मंदिर हटवण्याच्या निर्णयाला स्थगिती देण्यात आल्याचं लोढा म्हणाले.

**देवेंद्र फडणवीसांनी मांडली सविस्तर भूमिका...**

या सर्व घडामोडींवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सविस्तर भूमिका मांडली आहे. पुण्यामध्ये आयोजित पुस्तक महोत्सवासाठी देवेंद्र फडणवीस उपस्थित होते. त्यावेळी त्यांनी यावर प्रतिक्रिया दिली. न्यायालयाने याआधी निर्णय देऊन मंदिरांच्या श्रेणी केल्या आहेत.

जुनी मंदिरं त्या श्रेणीनुसार नियमित करता येतात. त्यामुळे रेल्वे प्रशासनाशी चर्चा करून आम्ही त्यातून नक्कीच मार्ग काढू. नियमातील तरतुदीनुसार त्या मंदिराचं नियमितीकरण आपण करून घेऊ, असं देवेंद्र फडणवीसांनी यावेळी स्पष्ट केलं. त्यामुळे दादरमधील या मंदिराचंही नियमितीकरण होणार असल्याचं आता स्पष्ट झालं आहे.




## महाराष्ट्र वाल्मीकी गदिमा

मराठीतील श्रेष्ठ साहित्यिक, कवी, गीतकार, पटकथा लेखक ग. दि. माडगूळकर उर्फ ग. दि. मा यांची आज पुण्यतिथी. १ ऑक्टोबर १९१९ रोजी जन्मलेल्या गदिमांचे शिक्षण आटपाडी, कुंडल आणि औंध येथे झाले. गदिमा यांना लहानपणापासून लेखनाची आवड होती. जेष्ठ साहित्यिक वि. स. खांडेकर यांच्याकडे त्यांनी काही काळ लेखनिक म्हणून काम केले त्याचा त्यांना खूप फायदा झाला. वि स खांडेकर यांचे सर्व पुस्तके त्यांनी वाचून काढले. वि. स. खांडेकर यांच्याकडून प्रेरणा घेऊन त्यांनीही लिहिण्यास सुरवात केली. त्यांनी कथा आणि कविता यांचे विपुल लेखन केले. के. नारायण काळे यांचे सहाय्यक दिग्दर्शक म्हणून त्यांनी काही काळ काम केले. भक्त दामाजी आणि पहिला पाळणा या चित्रपटासाठी त्यांनी गीतलेखन केले. लोकशाहीर रामजोशी या गाजलेल्या चित्रपटासाठी त्यांनी गाणी लिहिली इतकेच नव्हे तर या चित्रपटाची कथा आणि संवादही त्यांनीच लिहिले हा चित्रपट खूप लोकप्रिय झाला. या चित्रपटाला खूप लोकप्रियता मिळाल्याने कवी आणि लेखक म्हणून त्यांचे नाव सर्वदूर पोहचले. या चित्रपटात त्यांनी छोटीशी भूमिकाही केली होती. त्यानंतर त्यांनी अनेक चित्रपटांसाठी पटकथा आणि गाणी लिहिली. त्यांच्या चित्रपटाच्या कथा वैविध्यपूर्ण होत्या. संवादही सोपे पण प्रेक्षकांच्या मनाला भिडणारे होते. त्यांनी दीडशेहून अधिक चित्रपटासाठी कथालेखन केले. त्यांनी मराठी चित्रपटांसाठी लिहिलेले गीते चैत्रबन ह्या नावाने संग्रहित आहे, तसेच त्यांनी लिहिलेल्या काही चित्रकथा ही मराठी चित्रकथा या नावाने प्रकाशित झाल्या आहेत. गदिमांच्या कवितेवर ज्ञानेश्वर, नामदेव, तुकाराम, आदी संतांच्या कवितेप्रमाणेच पंडिती आणि शाहिरी कवितेचेही सखोल संस्कार झाले होते, ह्याचा प्रत्यय त्यांनी चित्रपटांसाठी लिहिलेल्या सुंदर घाटाच्या, परंतु प्रभावी गीतांतून येते. त्यांच्या कवितेतील अस्सल मराठमोळेपणामागेही हेच संस्कार दिसून येते. त्यांनी लोकगीते, समरगीते आणि बालगीतेही लिहिली. त्यांच्या गीतरामायणाने तर लोकप्रियतेचा उच्चांक गाठला. गीतरामायणाच्या कार्यक्रमाचे हजारो कार्यक्रम झाले अजूनही होत आहेत. गीतरामायण ऐकले नाही असा मराठी माणूस शोधूनही सापडणार नाही. लोकांना गीतरामायण इतके आवडले की लोकांनी त्यांना महाराष्ट्र वाल्मिकी ही पदवी दिली. ते कवी, लेखक तर होतेच पण उत्तम अभिनेतेही होते. पुढचं पाऊल, पेडगावचे शहाणे, लाखाची गोष्ट, वऱ्हाडी आणि वाजंत्री या चित्रपटात त्यांनी केलेल्या भूमिका संस्मरणीय ठरल्या. गदिमांनी केवळ मराठीतच नव्हे तर हिंदीतही आपले स्वतंत्र स्थान निर्माण केले. त्यांच्या कथेवर आधारित २५ हिंदी चित्रपटाची निर्मिती झाली. दो आँखे बाराह हाथ, नवरंग, गुंज उठी शहनाई, तुफान और दिया, आदमी सडक का या गाजलेल्या हिंदी चित्रपटांची पटकथा त्यांनीच लिहिली. गुरुदत्त यांचा प्यासा, राजेश खन्ना यांचा अवतार, अमिताभ बच्चन, राणी मुखर्जी यांचा ब्लॅक या चित्रपटांच्या मूळ कथाही गदिमा यांच्याच. चार दशकांहुन अधिक काळ रसिकांच्या मनावर राज्य केलेल्या गदिमांचा पद्मशी पुरस्कार देऊन सरकारने गौरव केला. १९७३ साली यवतमाळ येथे झालेल्या मराठी साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. महाराष्ट्र राज्याच्या विधानपरिषदेचेही ते सदस्य होते. १४ डिसेंबर १९७७ रोजी गदिमांचे निधन झाले. गदिमांसारखी बहुमुखी प्रतिमा असलेले रत्न मराठी मातीत जन्माला आले हे महाराष्ट्राचे भाग्यच. आपल्या बहुमुखी प्रतिमेने मराठी साहित्याच ी त्यांनी जी सेवा केली त्यासाठी मराठी माणूस कायम त्यांचा ऋणी राहील.

बहुमुखी प्रतिमा आणि अष्टपैलू व्यक्तिमत्वाच्या जोरावर रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवणाऱ्या गदिमांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

# सभापतीं विरोधात अविश्वास ठराव येणे 'अभूतपूर्व'

लोकशाहीच्या दृष्टीने सत्ताधारी आणि विरोधक हे दोघेही तितकेच महत्त्वाचे असतात आणि दोघांमधे योग्य समन्वय साधत सभागृह चालले पाहिजे, त्यासाठी पिठासीन अधिकाऱ्याची भुमिका ही महत्वाची ठरते, म्हणूनच राष्ट्रपती, उपराष्ट्रपती पंतप्रधान, मुख्यमंत्री, लोकसभेचे अध्यक्ष, राज्यसभेचे सभापती ही घटनात्मक पदे असतात आणि त्यावर बसणारी व्यक्ती ही कोणत्याही राजकीय पक्षाची नसते आणि या जरी ते एखाद्या राजकीय पक्षाचे म्हणुन नियुक्त झाले असले तरी व्यक्तींनी पदावर असेपर्यंत निष्पक्षपातीपणे आणि निर्भीडपणे सर्वांना समान संधी या पद्धतीने काम करणे अपेक्षित आहे, पदावर बसलेल्या व्यक्तीनेच जबाबदारीने, पदाचे भान राखत आपली घटनात्मक जबाबदारी पार पाडायला हवी, काहींनी तर पदावर बसताच आपल्या पक्षाचा राजीनामा दिला आहे. त्या पदावर बसलेल्या व्यक्तीवर पदाची प्रतिष्ठा, लोकशाही मुल्य, घटनेचे पालन, सभागृहाचे पावित्र्य राखले जाते आणि ते राखले गेलेच पाहिजे.

गेल्या दहा बारा वर्षांपासून देशात अनेक गोष्टी पहिली बार घडत आहेत त्यातल्या काही गोष्टी चांगल्या आहेत तर अनेक गोष्टी चुकीच्या घडत आहे आणि त्यामुळे देशात परदेशात भारताची चर्चा होत आहे. राज्यसभेच्या ईतिहासात पहिल्यांदाच पिठासीन अधिकारी असलेल्या सभापतींवर सभागृहातील सदस्यांनी 'अविश्वास' असल्याची नोटीस राज्यसभा सचिवालयाला पाठवली आहे. राज्यसभेचे सभापती हे देशाचे ऊपराष्ट्रपती देखील असतात. मात्र जगदीप धनखड यांना नेमके हेच जमत नाही त्यामुळे ते आपल्या पदाचे भान विसरून आपल्या पक्षाशी निष्ठा कायम ठेवत राजकीय नेत्या प्रमाणे वागताना दिसतात आणि दिवसेंदिवस त्याचा अतिरेक झाला, त्यामुळेच अखेर नाईलाजाने विरोधी पक्षांना त्यांच्या विरोधात अविश्वास ठराव आणावा लागला. पश्चिम बंगाल चे राज्यपाल म्हणून काम करतांना त्यांनी राज्यपाल म्हणून नव्हे तर भाजपचे म्हणून काम केले आणि त्याची बक्षिसी म्हणूनच त्यांना ऊपराष्ट्रपती पद मिळाले, २०१४ नंतरच्या बदलेल्या राजकारणात, सत्ताकारणात हे असेच घडणार 'मोदी है तो मुमकीन है'. सर्वपल्ली राधाकृष्ण, झाकीर हुसेन, व्ही. व्ही. गिरी, बी. डी. जत्ती, एम. एच. हिदायतुल्ला, शंकर दयाळ, शर्मा, के. आर. नारायणन, भैरवसिंग शेखावत, वेंकय्या नायडू अशा अनेकांनी ऊपराष्ट्रपती म्हणून पदाची निष्ठा राखत, आपले कर्तव्य बजावले आहे. या पैकी कोणीही वादग्रस्त ठरले नाहीत, जगदीप धनखड मात्र सर्वात जास्त वादग्रस्त ठरत आहे, सत्ताधारी आणि विरोधी पक्ष यांच्यात ते नेहमीच दुजाभाव करत आले आहेत आणि त्यांच्या अशा वागण्याने पदाचे अवमूल्यन होत आहे याचे ही भान त्यांना राहिलेले नाही. राज्यसभा हे वरिष्ठांचे सभागृह मानले जाते आणि या महत्त्वाच्या सभागृहाचे ते सर्वोच्च स्थान भुषवित आहे आणि त्यांची निष्ठा, बांधिलकी कोणा राजकीय नेत्या, पक्षाशी नसावी तर ती देशाची घटना, देशातील जनतेशी असावी.

राज्यसभा ही कधीच विसर्जित होत नाही, राज्यसभेत २४५ खासदार असतात, आठ जागा रिकाम्या आहेत, एनडीए कडे भाजप चे ९८ सहित १२५ ईतके संख्याबळ आहे, अविश्वास ठराव ना मंजुर होणार हे स्पष्ट आहे, मात्र या निमित्ताने धनखड यांच्या कार्यपद्धतीविषयी सभागृहात चर्चा होणार, हे देखील तितकेच महत्त्वाचे आहे. पक्षपातीपणाचा अतिरेक केल्यामुळेच धनखड यांनी स्वतःहुन ही वेळ ओढवून घेतली आहे आणि इतिहासात याची नोंद होणार. धनखड म्हणतात मी शेतकऱ्याचा मुलगा आहे मात्र ते पिठासीन अधिकारी असतांना सातशे शेतकऱ्यांचा मृत्यू झाला तर एका मंत्र्यांच्या मुलाने अनेक शेतकऱ्यांना चिरडले तेव्हा धनखड हे मौनीबाबा बनले. त्यांनी बोलबच्चन होण्यापेक्षा आपल्या पदाला साजेशे कर्तव्य पार पाडावे हे अपेक्षित आहे. केवळ जगदीप धनखड हेच नव्हे तर असे अनेक धनखड हे आपल्या घटनात्मक पदाचा सदुपयोगापेक्षा दुरुपयोगच अधिक करत आहेत आणि वर त्याचे समर्थन करतात हे अनेकदा अधोरेखित झाले आहे,घटनात्मक पदांना दिलेले संरक्षण काही अशासाठी दिलेले नाही. आपल्या विरोधातच अविश्वास ठराव का यावा याचा त्यांनीच अंतर्मुख होऊन विचार करायला हवा. मोदी सरकारच्या काळात जवळपास सर्वच यंत्रणा, घटनात्मक पदे कधी नव्हे इतकी वादग्रस्त ठरत आहे आणि प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे.

सत्तेवर, पदावर आज कोण येईल, ऊद्या दुसरा कोणी येईल मात्र पदावर बसलेल्या व्यक्तीनेच जबाबदारीने काम न करता पदाचे अवमूल्यन होईल असे करावे याचे समर्थन कोणीही करणार नाही. सध्याचे मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार हे देखील दुसरे धनखड पद्धतीनेच काम करत आहेत, विरोधी पक्ष त्यांच्या विरोधात देखील महाभियोगाची तयारी करत आहे. अशा व्यक्तींच्या वागण्यामुळेच पदाचे अवमूल्यन होत आहे याचा विचार कोण करणार?.वास्तविक हा कटु प्रसंग ऊद्भवायलाच नको होता, सभागृहातील जेष्ठ नेते, सभागृहाचे नेते, संसदीय कार्यमंत्री, मंत्री यांनी पुढाकार घेऊन हा हे टाळले असते तर ते अधिक चांगले झाले असते.

**- अनंत बोरसे**
**शहापूर जिल्हा ठाणे**
**९१५८४९५०३७**

# महापालिका अधिकारी, कर्मचारी तसेच नागरिकांनी देखील ऊर्जा संवर्धनासाठी पुढाकार घ्यावा

**अक्षराज : विश्वनाथ शेनोय**

**दि.१४, कल्याण (ठाणे) :** ऊर्जेची बचत ही सद्यस्थितीत काळाची गरज बनली असून ऊर्जा संवर्धनासाठी महापालिका अधिकारी, कर्मचारी तसेच नागरिकांनी देखील पुढाकार घ्यावा असे प्रतिपादन महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त हर्षल गायकवाड यांनी केले. विद्युत विभागामार्फत महापालिका मुख्यालयाच्या प्रांगणात काल आयोजित केलेल्या ऊर्जा संवर्धन सप्ताहाच्या शुभारंभ समयी बोलताना त्यांनी हे प्रतिपादन केले.




ऊर्जा संवर्धन म्हणजे जबाबदारीने ऊर्जेचा वापर करणे होय. भारतातील ७० टक्के वीज निर्मिती ही कोळशापासून होते आणि आता कोळशाचे आयुष्यमान सर्वत्र कमी होत आहे त्यामुळे पुढील पिढीसाठी हे नैसर्गिक स्त्रोत जतन करावयाचे असतील तर ऊर्जा संवर्धनाची जबाबदारी प्रत्येक नागरिकाने उचलली पाहिजे , तरी आवश्यकता नसताना विजेचा वापर करू नये असे आवाहन महापालिकेचे विद्युत विभागाचे कार्यकारी अभियंता प्रशांत भागवत यांनी या समयी केले. संपूर्ण देशभरात १४ डिसेंबर हा ऊर्जा संवर्धन दिन तसेच १४ ते २० डिसेंबर या कालावधीत ऊर्जा संवर्धन सप्ताह साजरा केला जातो. महापालिकेच्या विद्युत विभागाकडूनही दरवर्षी ऊर्जा संवर्धन सप्ताहाचे आयोजन करण्यात येते. यावर्षी महापालिका मुख्यालयात आयोजित केलेल्या कार्यक्रमात उपस्थित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांमध्ये ऊर्जा बचतीबाबत जनजागृती करण्यात आली. या ऊर्जा संवर्धन सप्ताहात नागरिकांमध्ये जनजागृती करण्यासाठी विद्युत विभागाकडून तीन आकर्षक माहिती पत्रके तयार करण्यात आली आहेत. यापुढील आठवडाभर देखील विद्युत विभागाकडून कल्याण डोंबिवलीतील विविध सार्वजनिक ठिकाणी आणि गृहसंकुलात ऊर्जा संवर्धन आणि बचतीबाबत जनजागृती केली जाणार आहे. यावेळी विद्युत विभागाबाबत तयार करण्यात आलेल्या आलेल्या माहिती पुस्तिकेचे प्रकाशन उपस्थित अधिकाऱ्यांकडून करण्यात आले आणि ऊर्जा बचत आणि संवर्धनाची शपथ महानगरपालिका अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना देण्यात आली. यावेळी महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त हर्षल गायकवाड, योगेश गोडसे, शहर अभियंता अनिता परदेशी, महापालिकेचे ब्रँड ॲम्बेसेडर आणि महाराष्ट्र रेडिओलॉजिस्ट संघटनेचे डॉक्टर प्रशांत पाटील, न्यू रोटरी क्लब कल्याणचे बिजू उन्नीथन, महापालिकेचे इतर अधिकारी व कर्मचारी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.

## दत्त मंत्र..

मंत्रोच्चारजिव्हेतून
मोहरते गात्र गात्र
जाणीव होईअद्भुत
दत्तात्रय वसे सर्वत्र

अदृश्यपणे शाश्वत
सद्गुरूंचे कृपाछत्र
गुरुउर्जा बहरे पूर्जा
चाले उत्साहजनित्र

पळे दुर्गणीपिशाच्च
नकोभय अणू मात्र
सुशुद्ध ज्ञानस्वरूपी
गुरूराज तू चिन्मात्र

वाटचालीवर अखंड
खिळले तव दक्षनेत्र
गाणगं औदुंबरवाडी
गिरनारपिठापूर क्षेत्र

दत्ताचीस्थानेचोवीस
भक्तावरी धरले छत्र
धर्माचे मर्म जाणवते
बांधती सर्वांएकसूत्र


यथाशक्ती यथाशक्य
ऐका वाचा गुरूचरित्र
नियमाबंदिस्त राहता
कृपा करेल अत्रि पुत्र

पारायणे करावे नित्य
सामुदायिक वा एकत्र
त्रिमूर्तीधामी जरस्वर्ग
भरकटावे का अन्यत्र

**- हेमंत मुसरीफ, पुणे.**
**९७३०३०६९९६**

# लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल

**भारताचे पहिले उपपंतप्रधान, पहिले गृहमंत्री, लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांची आज स्मृतिदिन. सरदार वल्लभभाई पटेल यांचा जन्म ३१ ऑक्टोबर १८७५ रोजी आणंद या छोट्याशा गावात झाला.**




त्यांचे वडील झव्हेरिभाई यांनी १८५७ च्या स्वातंत्र्य लढ्यात भाग घेतला होता. त्यामुळे लहानपणीच त्यांना देशभक्तीचे बाळकडू मिळाले. त्यांच्या संपुर्ण कुटुंबावर स्वातंत्र्य चळवळीचा प्रभाव होता. सरदार पटेल हे हुशार विद्यार्थी होते. त्यांनी वकिलीचे शिक्षण पूर्ण करून बोरसाड येथे वकिली सुरू केली. एक अभ्यासू वकील म्हणून त्यांचे नाव सर्वदूर पोहचले पुढे ते बॅरिस्टर झाले. बॅरिस्टर झाल्यावर अहमदाबाद येथे त्यांनी वकिली सुरू केली. अल्पावधीतच एक निष्णात वकील म्हणून त्यांची कीर्ती देशभर पसरली. विकिलीसोबत त्यांना राजकारणाचीही आवड होती त्यामुळे त्यांनी अहमदाबाद पालिकेची निवडणूक लढवली त्यांनी ती निवडणूक सहज जिंकली. राजकारणात आल्यावर त्यांना जनतेचे मूलभूत प्रश्न समजू लागले. १९१७ साली खेडा जिल्ह्यात प्रचंड पाऊस झाला त्यामुळे खरिपाचे पीक वाया गेले. पुढे उंदराचा सुळसुळाट आणि किटकांमुळे रब्बीचे पीकही गेले त्यामुळे शेतकरी हवालदिल झाले. त्यातच दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाल्याने शेतकऱ्यांच्या हाती २५ टक्क्यांपेक्षाही कमी उत्पादन येईल अशी परिस्थिती निर्माण झाली. नैसर्गिक आपत्तीमुळे हवालदिल झालेल्या शेतकऱ्यांना शेतसाऱ्यात सूट मिळावी, शेतसाऱ्याची वसुली पुढे ढकलावी यासाठी त्यांनी १८ हजार शेतकऱ्यांच्या सह्या असलेले निवेदन सरकारकडे दिले पण सरकारने त्याची दखल न घेता शेतसारा वसुलीसाठी शेतकऱ्यांवर जप्तीचे आदेश दिले त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये असंतोष निर्माण झाला. महात्मा गांधी यांनी सक्तीच्या शेतसारा वसुली विरोधात खेडा येथे सत्याग्रह चळवळ सुरू केली. या चळवळीचे नेतृत्व त्यांनी सरदार पटेल यांच्याकडे सोपवले. शेतकऱ्यांचे हे आंदोलन त्यांनी अत्यंत निर्धाराने यशस्वी केले. या आंदोलनात त्यांनी केलेल्या नेतृत्वाने महात्मा गांधी भारावून गेले. पुढे महात्मा गांधी यांच्या प्रत्येक चळवळीत त्यांनी हिरीरीने भाग घेतला.

नेतृत्वाप्रमाणेच त्यांचे वक्तृत्वही प्रभावी होते. आपल्या वक्तृत्वाने जनसामान्यांना प्रभावित करणाऱ्या सरदार पटेलांनी १९२८ साली सायमन कमिशन विरोधात पुकारलेल्या बारडोली सत्याग्रहादरम्यान लोकांना आपल्या महान विचारांनी प्रभावित केले त्यामुळे इंग्रजांनी अवाजवी वाढवलेल्या करांना न भरण्यावर जनता सहमत झाली त्यामुळे ब्रिटिश व्हाइसरॉयला पराभव पत्करावा लागला. या आंदोलनात आपल्या सशक्त नेतृत्वाने वल्लभभाई पटेल जनतेत चांगलेच प्रसिद्ध झाले आणि बारडोलीतील लोक त्यांना सरदार म्हणू लागले त्यामुळे त्यांच्या नावापुढे सरदार जोडले जाऊ लागले. १९३० साली सविनय कायदेभंग चळवळीत भाग घेतला म्हणून त्यांना इंग्रजांनी अटक केली. त्यांना पाच वर्षांचा तुरुंगवास भोगावा लागला. १९४२ च्या चले जाव आंदोलनातही त्यांनी भाग घेतला त्यावेळीही त्यांना अटक झाली. १९४६ झाली स्थापन झालेल्या हंगामी सरकारमध्ये ते गृहमंत्री होते. गृहमंत्री या नात्याने त्यांनी भारत पाक फाळणीच्या चर्चेमध्ये निर्णायक भूमिका बजावली. देश स्वातंत्र्य झाल्यानंतर पंडित नेहरूंच्या नेतृत्वाखालील मंत्रिमंडळात ते उपपंतप्रधान बनले. त्यांच्याकडे गृहखाते, माहिती आणि नभोवाणी, संस्थानचा प्रश्न व निर्वासितांचा प्रश्न व निर्वासितांचे प्रश्न सारखे महत्वाचे खाते देण्यात आले. स्वातंत्र्य भारताचे गृहमंत्री झाल्यावर सरदार पटेल यांनी सर्वात आधी भारतातील वेगवेगळ्या संस्थानातील राजांना आपल्या दूरदर्शीपणाचा आणि बुद्धिमत्तेचा वापर करून भारतात विलीन होण्याची सूचना केली. बहुतांश संस्थानांनी याला सहमती दर्शवून भारतात विलीन झाले पण जुनागड, हैदराबादचा निजाम, जम्मू काश्मीर च्या राजांनी भारतात विलीन होण्यास नकार दिला. सरदार पटेलांनी आपल्या कुशाग्र बुद्धिमत्तेच्या बळावर सैन्याचा वापर करीत या तिन्ही संस्थानांना भारतात विलीन केले. सरदार पटेल यांनी तत्कालीन ५६५ संस्थाने भारतात विलीन करून एकसंध भारत निर्माण केला त्यांची ही कामगिरी ऐतिहासिक अशीच होती. त्यांच्या याच कामगिरीने त्यांना लोहपुरुष ही पदवी देण्यात आली. १९५० साली त्यांचे स्वास्थ्य बिघडू लागले. २ नोव्हेंबर १९५० ला त्यांचे स्वास्थ्य इतके बिघडले की ते अंथरुणावरुन उठण्यास देखील असमर्थ होते. पुढे १५ डिसेंबर १९५० रोजी हृदय विकाराच्या तीव्र झटक्याने त्यांची प्राणज्योत मालवली.

**सरदार पटेल यांना विनम्र अभिवादन!**
**- श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## गुणदर्शन स्पर्धेत मांडवे खुर्द शाळेचे घवघवीत यश



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१४, पारनेर (अहिल्यानगर)** : तालुक्यातील ग्रामीण भागातील जि.प.च्या मांडवे खुर्द शाळेतील विद्यार्थ्यांनी नुकत्याच पारनेर येथे झालेल्या तालुकास्तरीय विविध गुणदर्शन स्पर्धेत घवघवीत यश मिळवले. त्यांनी या स्पर्धेत मागील वर्षी ही चांगले यश मिळविले होते. जिल्हा परिषद दरवर्षी विविध गुणदर्शन स्पर्धेच्या माध्यमातून मुलांच्या कलागुणांना वाव मिळावा यासाठी दरवर्षी विविध स्पर्धांचे आयोजन करते. सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात नुकत्याच देवीभोयरे आणि पारनेर येथे संपन्न झालेल्या तालुकास्तरीय स्पर्धेत मांडवे खुर्द जिल्हा परिषदेच्या शाळेतील विद्यार्थ्यांनी प्रभावी कामगिरी केली. या स्पर्धेमध्ये वक्तृत्व स्पर्धेत दुसरीची विद्यार्थिनी ओवी सुनिल गागरे ही (किलबिल गट- प्रथम) व हस्ताक्षर स्पर्धेत सातवीची विद्यार्थिनी जिविका एकनाथ गागरे ही (कुमार गट - प्रथम) क्रमांक मिळवत या विद्यार्थिनींची जिल्हा स्तरासाठी निवड झाली. हस्ताक्षर स्पर्धेमध्येच इयत्ता दुसरीचा विद्यार्थी गणेश सचिन आहेर हा (किलबिल गट - द्वितीय) व रुद्र प्रकाश गागरे (किलबिल गट - तृतीय) क्रमांक पटकाविला आहे. दोन विद्यार्थिनींची जिल्हा स्तरावर निवड झाली आहे. मुख्याध्यापक बाबाजी ढोकळे, वर्गशिक्षक प्रितम बर्वे, लता शिरसाट, दत्तात्रय रोकडे,मंगल झावरे, संदिप गाडे, संदिप झावरे यांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष यशवंत जाधव, माजी सरपंच सोमनाथशेठ आहेर, गौतम बागुल, कैलास गागरे, रेवणनाथ गागरे, ग्रामपंचायत सदस्य, सर्व ग्रामस्थ यांनी प्रत्यक्ष शाळेत येऊन विद्यार्थ्यांचे सत्कार करून शुभेच्छा दिल्या.

## ठाणे जिल्ह्यात महिलांसाठी ५ समुपदेशन केंद्र

**अक्षराज : विकास दळवी**

**दि.१४, ठाणे :** लैंगिक शोषण, छळ, मारहाण आदींनी त्रासलेल्या महिलांना योग्य मार्गदर्शन करण्यासाठी जिल्ह्यात ठिकठिकाणी ५ समुपदेशन केंद्रे व त्यात तज्ञ मार्गदर्शक नेमले आहेत. घरात नवरा मारतो किंवा कामाच्या ठिकाणी मालक लैंगिक छळ करतो. या व अशा कौटुंबिक हिंसाचार, छळ, मारहाण या कारणाने पीडीत महिलांची समस्या या समुपदेशन केंद्रातील कर्मचारी, अधिकारी जाणून घेतील व त्यावर कायदेशीर मार्ग कोणते आहेत. याबाबत सल्ला देतील. सल्ला घेण्यासाठी आलेल्या या महिलांचे सामाजिक, मानसशास्त्रीय, कायदेशीर समुपदेशन या केंद्रात केले जाते. महिलांचे समुपदेशन करण्यासाठी कार्यालयीन वेळेत कामकाज सुरू असल्याची माहिती जिल्हा कार्यक्रम अधिकारी संजय बागूल यांनी दिली. महिला व बालविकास विभागामार्फत २०२४-२५ या आर्थिक वर्षात महिलांसाठी विशेष योजनांतर्गत समुपदेशन केंद्र चालविण्यात येत आहे. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यात ५ समुपदेशन केंद्र सुरू केलेली आहेत. प्रत्येक केंद्रासाठी संस्थेमार्फत समुपदेशक, विधी सल्लागार यांची नियुक्ती केली आहे. या ठिकाणी आलेल्या महिलांना कायदेशीर, मानसोपचारतज्ज्ञ व पोलिसांची मदत मिळवुन दिली जाते. यासाठी जिल्हा पातळीवरील संस्थेला विधी सल्लागार व समुपदेशन यांना प्रत्येकी दरमहा १२ हजार रुपये, तालुका पातळीवरील संस्थेला प्रत्येकी ९ हजार रुपये मानधन दिले जाते. कौटुंबिक समुपदेशन केंद्र, भारतीय महिला फेडरेशन (ठाणे समिती), सार्वजनिक बांधकाम विभाग दुसरा मजला, ठाणे (प) या ठिकाणासह महिला व बाल सहाय्य केंद्र, पंचायत समिती कार्यालय पहिला माळा, कल्याण येथे समुपदेशन केंद्र आहे.

## डोणगाव येथे आजपासुन दत्त जयंती यात्रा प्रारंभ

**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.१४, मुदखेड (नांदेड) :** तालुक्यातील मौजे डोणगाव येथे दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी परंपरेने चालत आलेली श्री दत्त जयंती महोत्सव यात्रेला प्रारंभ झाला आहे. डोणगाव येथील यात्रा पंचक्रोशीत प्रसिद्ध असलेले परिसरातून बहुसंख्य नागरिक व बाहेरगावी असलेले गावातील मूळ नागरिक यात्रेनिमित्त गावात आपल्या कुटुंबासह श्री दत्त जयंती जन्मोत्सवामध्ये सहभागी होतात दत्त जन्म दिनांक १५ डिसेंबर ठीक दुपारी १२ वाजता होणार असून गेल्या सप्ताहभर पासून या ठिकाणी श्रीदत्त अखंड हरिनाम सप्ताह चालू आहे. त्यामुळे गावात भक्तीमय वातावरण तयार झाले आहे. सायंकाळी दत्तमूर्तीच्या पालखीचे गावाला परिक्रमा होईल सायंकाळी श्री दत्त मंदिरामध्ये महापूजा होणार असून गावकरी भाविक भक्तांनी या मंदिरामध्ये दर्शन घ्यावे. सोमवार, दिनांक १६ डिसेंबर रोजी कुस्त्यांचे जंगी सामने दुपारी १ वाजता होणार आहेत. कुस्तीचे प्रथम बक्षीस ५ हजार ५५१ रु कै. दिगांबर संभाजी हामंद टमाटेवाले यांच्या स्मरणार्थ मधुकर दिगांबर हामंद यांच्या वतीने द्वितीय बक्षीस ३ हजार ५०० रु कै. देविदास शिवराम बोबडे यांच्या स्मरणार्थ शरद देविदास बोबडे यांच्या वतीने ठेवण्यात आले आहे. या रंगतदार कुस्त्यांचे दंगल पाहण्यासाठी नागरिकांनी यात्रेत सहभागी व्हावे. असे आवाहन गावच्या प्रथम नागरिक सरपंच पल्लवी राजेंद्र हामंद, गावचे पोलीस पाटील राजेंद्र नागनाथ हामंद यात्रा कमिटीचे अध्यक्ष राजेश विठ्ठलराव हामंद, उपाध्यक्ष आनंदा बाजीराव गंड्रस, दत्त मंदिराचे पुजारी केशव गिरी महाराज व समस्त गावकऱ्यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## लिटल कमांडर शाळेने साजरा केला 'ग्रँड पॅरेंट्स डे'

**अक्षराज : अनंत बोरसे**

**दि.१४, शहापूर (ठाणे) :** शहापूर मधील लिटल कमांडर शाळेने, शनिवारी आपल्या शाळेत शिकणाऱ्या बालकांच्या आजी आजोबांच्या 'ग्रँड पेरेंट्स डे' कार्यक्रमाचे आयोजन केले होते. यावेळी प्रत्येक आजी आजोबांचे फुलांची पुष्पवृष्टी करुन तसेच पाद्यपुजन करुन स्वागत करण्यात आले. तसेच सेल्फी घेण्यासाठी येथे सेल्फी पॉईंट देखील ऊभारण्यात आला होता. सर्वांचे स्वागत मुख्याध्यापिका सौ. दिपा ठाकुर यांनी प्रास्ताविक केले. यावेळी दुसरी तिसरी च्या बालकांनी आजचे आजी आजोबा नातवासाठी काय करतात याचे छोटेसे नाट्य सादर केले. शिवतेज जैन यांच्या आजोबांनी आपले मनोगत व्यक्त करतांना या अनोख्या कार्यक्रमाचे कौतुक केले आणि शाळेसाठी आपले योगदान देण्याचे आश्वासन दिले. तर पातकर या आजोबांनी शाळेने आयोजित केलेल्या अनोख्या कार्यक्रमाचे कौतुक केले. यावेळी पाल्यांसोबत खेळ खेळण्यात आजी आजोबांनी लहानपण अनुभवले आणि कार्यक्रमाचा आनंद लुटला. वृत्ती कांदळकर, कल्पना मिश्रा, सोनाली माळी, प्रिती सिंग, किर्ती वेखंडे, मनिषा खरतोडे, मोनिका पाटील, विद्या गुजराथी, गायत्री ढलपे, मोनिका वेखंडे यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले होते. तर वृत्ती कांदळकर यांनी ऊपस्थितांचे आभार मानले. सर्वांनी अल्पोपाहाराचा आनंद घेत कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला.

# जलसंधारणाच्या कामांमुळे टाकळी ढोकेश्वर गावच्या पाणी पातळीत वाढ

### आम्ही टाकळीकर ग्रुपच्या ७ कामांमुळे शाश्वत जलसाठा उपलब्ध; पिण्यासाठी, शेतीसाठी मुबलक पाणी



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१४, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यातील टाकळीढोकेश्वर गावातील विविध क्षेत्रांत कार्यरत असलेल्या भूमिपुत्रांनी गेल्या ६ वर्षांपूर्वी कोरोना महामारीच्या काळात एकत्रित येऊन आम्ही टाकळीकर ग्रुपच्या माध्यमातून कृतीशील ग्रामविकासाची चळवळ उभी करण्यात आली होती. या माध्यमातून माथा ते पायथा पाणीदार टाकळी हा संकल्प गावातील ग्रामस्थ व तरुणांनी हाती घेऊन जलसंधारणाची विविध कामे हाती घेऊन गावातील छोटे मोठे बंधारे, केटीवेअर जलसंधारणाचे कामे केली. त्याचा परिणाम आज दिसत असून पाण्याची पातळी वाढून शाश्वत जलसाठा उपलब्ध झाला आहे.

नगर - कल्याण राष्ट्रीय महामार्गावरील टाकळी ढोकेश्वर हे तालुक्यातील मोठी बाजारपेठचे गाव म्हणून ओळखले जाते. गावातील आम्ही टाकळीकर ग्रामविकास प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ.बाळासाहेब बांडे यांच्या मार्गदर्शनाखाली गावातील विविध क्षेत्रांत कार्यरत असलेल्या भूमिपुत्रांनी यासाठी पुढाकार घेत पाण्याच्या समस्येवर मात करण्यासाठी मागिल ६ वर्षांपूर्वी लोकसहभाग, विविध संस्था, सरकारी विभाग यांच्या सहकार्याने (मे २०१९-२०) कोरोना महामारीच्या काळात एकत्रित येऊन जलसंधारणाचे कामे केली. यामध्ये निवडुंगेवाडी तलावाचे खोलीकरण मजबुतीकरण व परिसरातील गावाच्या मुख्य ओढ्यावर सात केटीवेअर,छोटे मोठे बंधारे तयार केले. याकरिता कृषी विभाग,वन विभाग, सामाजिक वनीकरण यांचे ही सहकार्य लाभले. या सर्व कामामुळे परिसरातील व गावातील पाण्याची पातळी वाढून शाश्वत पाणीसाठा वाढण्यास मदत झाली. निसर्गाने साथ दिल्याने यावर्षी झालेल्या भरपूर पावसाने हे सर्व बंधारे केटीवेअर तुडुंब भरून ओढा वाहत आहे.

> जलसंधारणाच्या कामांमुळे परिसर बहरला पावसाळ्यानंतर २ ते ३ महिन्यात विहिरींचे पाणी अटत असे. ६ वर्षांपूर्वी आम्ही टाकळीकर ग्रामविकास प्रतिष्ठानच्या माध्यमातून व गावातील ग्रामस्थ एकत्र येत जलशुद्धीकरण प्रकल्प, गावातील बारव सुशोभीकरण, अमरधाम व शौचालय प्रकल्प नुतनीकरण यासह जलसंधारणाचे कामे ग्रामविकासाची चळवळ उभी केली. त्याचा परिणाम या ही वर्षी होताना दिसत आहे. ६ वर्षांपूर्वी केलेल्या जलसंधारणाच्या कामांमुळे या ही वर्षी मात्र विहिरींना चांगल्या प्रमाणात पाणी असल्याने शेतीसाठी पाणी मिळत आहे. पाण्यामुळे इतर ही परिसर बहरला आहे. गावात असणाऱ्या प्रत्येक बंधाऱ्यातील गाळ काढण्यासोबत जलयुक्त शिवार आणि गाळ मुक्त धरण या योजनेअंतर्गत विविध कामे होणे गरजेचे आहे. प्रत्येक वर्षी एक नावीन्यपूर्ण लोकोपयोगी प्रकल्प या भूमिकेतून आम्ही टाकळीकर समुहाने १० वर्षात १० प्रकल्प गावात उभारले आहेत.
>
> **- डॉ.बाळासाहेब बांडे**
>
> **(अध्यक्ष, आम्ही टाकळीकर ग्रामविकास प्रतिष्ठान, टाकळीढोकेश्वर)**

# अहिल्यानगर जिल्ह्यातील १ हजार २६६ शाळांमध्येच बसविले सीसीटीव्ही कॅमेरे

### ३ हजार ९०६ शाळांना कॅमेर्यांची प्रतीक्षा

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१४, अहिल्यानगर :** बदलापूरच्या शाळेत विद्यार्थिनींवर झालेल्या अत्याचाराच्या घटनेनंतर विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला. सरकारने तातडीने राज्यातील सर्व शाळांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यासह सुरक्षाविषयी सर्व उपाययोजना एक महिन्यात करण्याचे आदेश दिले.

मात्र आदेश देऊन देखील अहिल्यानगर जिल्ह्यातील ५ हजार १७२ शाळांपैकी फक्त एक हजार २६६ शाळांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहे. उर्वरित ७५ टक्के म्हणजे ३ हजार ९०६ शाळांना सीसीटीव्ही कॅमेर्यांची प्रतीक्षा आहे.



**सीसीटीव्हीसाठी पैसे नाही शासनाने सर्व शाळांमध्ये सीसीटीव्ही बसविण्याच्या सूचना दिल्या. मात्र त्यासाठी निधी उपलब्ध झालेला नाही. त्यामुळे सीसीटीव्ही बसवले गेले नसल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले. जिल्हा नियोजन समितीकडून यासाठी निधी उपलब्ध करून देण्याचे सांगितले गेले होते. मात्र सीसीटीव्ही बसविण्याचे आदेश दिल्यानंतर विधानसभा निवडणूक लागली. निवडणूक संपली तरी सध्या पालकमंत्री नसल्याने जिल्हा नियोजन मधून निधी उपलब्ध होत नाही. परिणामी निधीअभावी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचे रखडले आहे.**

बदलापूरच्या घटनेनंतर शासनाने आदेश काढला. अहिल्यानगर जिल्ह्यात देखील जिल्हा परिषदेने २१ ऑगस्ट रोजी आदेश काढून सरपंच, ग्रामसेवक यांना आपआपल्या गावातील जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याबाबत कळविले होते. तसेच शाळेतील शिक्षकेतर कर्मचार्यांची नियुक्ती करतांना काळजी घेण्यात यावी, त्यांची चारित्र पडताळणी तातडीने करण्यात यावी. ६ वर्षापर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी प्राधान्याने महिला कर्मचार्यांची नियुक्ती करण्यात यावी. शाळांमध्ये तक्रार पेटी बसविण्यात यावी, शाळांमध्ये सखी सावित्री समितीची तातडीने स्थापन करण्यात यावी. तसेच विद्यार्थी सुरक्षा समिती देखील प्रत्येक शाळेत स्थापन करण्याचे आदेश दिले होते. पुढील एक महिन्यात या सर्व उपाययोजना करण्याचे आदेशात स्पष्ट केले होते.

मात्र आज एक महिन्याची मुदत संपवून ३ महिने लोटले तरी अनेक शाळांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे व चारित्र पडताळणी करण्यात आलेली नाही. जिल्ह्यात जिल्हा परिषद, महापालिका, नगरपालिकांच्या ३ हजार ५०४, खासगी अनुदानित १ हजार २१ तर विनाअनुदानित व स्वयं अर्थसहाय्यक ६४७ शाळा आहेत.

चारित्र्य पडताळणीकडे दुर्लक्ष शाळांमधील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची चारित्र्य पडताळणी करण्याकडे देखील शाळा प्रशासनाने दुर्लक्ष केल्याचे दिसून येते आहे. ५ हजार १७२ शाळांपैकी केवळ २८५ शाळांमध्ये शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची चारित्र्य पडताळणी झाली आहे. उर्वरित ४ हजार ८८७ शाळांमध्ये चारित्र्य पडताळणी झालेली नाही.

त्यात जिल्हा परिषद, महानगरपालिकेच्या ३ हजार ५०४ शाळांपैकी केवळ १६० तर खाजगी १ हजार २१ शाळांपैकी ३२ शाळांमध्ये शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची नियुक्ती देखील जिल्हा परिषदेच्या १६१, खाजगी ८६ तर विनाअनुदानित १८९ शाळांमध्ये झाली आहे.

# माहिती अधिकार विषयक विशेष कार्यशाळा उत्साहात संपन्न

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.१४, नवी मुंबई :** माहितीचा अधिकार अधिनियम २००५ ची अंमलबजावणी करतांना शासकीय अधिकारी, कर्मचारी यांना येणाऱ्या अडचणींचे निराकरण व्हावे व त्यांना अधिनियमाची सर्वांगीण माहिती व्हावी. या दृष्टीने माहितीचा अधिकार विषयक एक दिवसीय प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले असून या माध्यमातून कायद्याची उजळणी होईल व माहिती अधिकार अन्वये प्राप्त होणाऱ्या अर्जांवर योग्य कार्यवाही होऊन अपिलांची संख्या कमी होईल असा विश्वास महाराष्ट्र राज्य माहिती आयोगाच्या कोकण खंडपीठाचे आयुक्त शेखर चन्ने यांनी व्यक्त केला.

महाराष्ट्र राज्य माहिती आयोग कोकण खंडपीठाच्या वतीने नवी मुंबई महानगरपालिका व यशदा, पुणे यांच्या सहयोगाने महापालिका मुख्यालयातील ज्ञान केंद्रात आयोजित माहितीचा अधिकार अधिनियम २००५ - एक दिवसीय प्रशिक्षण कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते आपले मनोगत व्यक्त करीत होते. याप्रसंगी नवी मुंबई महानगरपालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे, अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार, प्रशासन विभागाचे उपआयुक्त शरद पवार, शहर अभियंता शिरीष आरदवाड उपस्थित होते. आयोगाच्या वतीने उपसचिव रीना फणसेकर यांनी उपस्थितांचे स्वागत केले. या कार्यशाळेमध्ये नवी मुंबई महानगरपालिकेसह कल्याण डोंबिवली, मिरा भाईंदर, उल्हासनगर, पनवेल महानगरपालिकेचे जनमाहिती अधिकारी मोठया संख्येने सहभागी झाले होते.

माहिती अधिकाराबाबत द्वितीय अपील घेताना अनेकदा जनमाहिती अधिकारी हे माहितीचा अधिकार कायद्यातील तरतुदी बाबत अनभिज्ञ असल्याने त्यांच्यावर शास्तीची कारवाई करावी लागते हे लक्षात आल्याने प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित करण्याचा विचार पुढे आला असे सांगत आयुक्त शेखर चन्ने यांनी प्रशिक्षणात वक्त्यांसोबतच्या सुसंवादातून कायद्याविषयीचे शंकानिरसन होईल व माहितीचा अधिकार अधिनियम अंतर्गत कामकाज अधिक आत्मविश्वासाने व योग्यप्रकारे करण्यास मदत होईल असे मत व्यक्त केले.

याप्रसंगी बोलताना नवी मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी माहितीचा अधिकारामुळे प्रशासनात निर्णयाच्या उत्तरदायित्वाची भूमिका वाढली असे सांगत जनमाहिती अधिकाऱ्यांना प्रशिक्षीत केल्याने कायद्याची चांगल्या रितीने अंमलबजावणी होईल व पारदर्शक प्रशासन राबविण्यास मदत होईल असे सांगितले.

यशदाचे माहिती अधिकार विषयक तज्ज्ञ प्रशिक्षक रेखा साळुंखे व दादू बूळे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम मुद्देनिहाय समजवून सांगितला आणि यामध्ये जन माहिती अधिकाऱ्यांची महत्वाची भूमिका विशद केली. प्रशिक्षणा दरम्यान उपस्थित जनमाहिती अधिकाऱ्यांनी उत्स्फुर्त प्रतिसाद देत प्रश्नोत्तराद्वारे शंका समाधान करुन घेतले. महत्वाचे म्हणजे राज्य माहिती आयुक्त प्रशिक्षण सत्रास पूर्णवेळ उपस्थित होते.

त्यांनीही जनमाहिती अधिकाऱ्यांना येणाऱ्या अडचणींचे निराकरण केले. कक्ष अधिकारी अचला खांडेकर यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी अवर सचिव शारदा पाटील व आयोगातील सर्व अधिकारी, कर्मचारी यांनी महानगरपालिकेच्या अधिकारी, कर्मचारी यांच्या सहयोगाने महत्वाची भूमिका बजावली.

या प्रशिक्षण उपक्रमामुळे माहिती अधिकार कायद्याविषयी अधिक सुस्पष्टता आली व आत्मविश्वास वाढला अशा प्रतिक्रिया अनेक अधिकारी, कर्मचारी यांनी व्यक्त केल्या.

# सोमवारी (दि.१६) महिला लोकशाही दिन

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१४, छत्रपती संभाजीनगर :** जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिन दर महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी आयोजित केला जातो. त्याअनुषंगाने सोमवार, दि.१६ रोजी जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिन सकाळी



११ ते १२ या वेळात जिल्हाधिकारी कार्यालयात होणार आहे. या महिला लोकशाही दिनात महिलांच्या तक्रारींची दखल घेतली जाते. त्यासाठी महिलांनी आपली तक्रार दोन प्रतित जिल्हा महिला व बालविकास अधिकारी यांच्या कार्यालयात दाखल करावी. तक्रारी वैयक्तिक स्वरुपाची असावी, प्रकरण न्याय प्रविष्ठ नसावे, सेवा व आस्थापनाविषयक बाबी विचारात घेतल्या जाणार नाहीत. तरी महिलांनी या लोकशाही दिनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा महिला व बालविकास अधिकारी आर.एन.चिमद्रे यांनी केले आहे.

# जिल्ह्यात सिकलसेल नियंत्रण सप्ताह

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.१४, ठाणे :** राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत सिकलसेल आजार नियंत्रण कार्यक्रम आरोग्य संस्थास्तरावर राबविण्यात येत असून जिल्हयामध्ये आरोग्य विभागामार्फत जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व तालुक्यांमध्ये सर्व शासकीय आरोग्य संस्था, सर्व प्राथमिक आरोग्य केंद्र, उपकेंद्र येथे दि.११ ते १७ डिसेंबर २०२४ हा कालावधी सिकलसेल नियंत्रण सप्ताह'' म्हणून साजरा करण्यात येत आहे. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.गंगाधर परगे यांच्या सूचनेनुसार प्रत्येक आरोग्य केंद्रामध्ये रुग्णांची तपासणी करून लोकांमध्ये या आजार विषयक जनजागृतीचे कार्यक्रम घेण्यात येत आहेत.

यावेळी तपासणी सोबत वैद्यकीय अधिकारी यांच्याकडून समुपदेशन व जनजागृती केली जात आहे. तसेच शाळा व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना (वय १२ ते १७) सिकलसेल आजार त्याचे संक्रमण, संभाव्य धोके इत्यादीबाबत जनजागृती करण्यात येत आहे.

ठाणे जिल्ह्यामध्ये सिकलसेल आजार आढळून येतो. हा आजार अनुवंशिक असून या आजारावर अद्याप कोणताही कायमस्वरूपी उपचार उपलब्ध



नाही. या आजाराने ग्रस्त असलेल्या रोगी व वाहक व्यक्तीवर औषधोपचार करण्यात येत असले तरी या रोगाचा प्रादुर्भाव पुढच्या पिढीमध्ये टाळता यावा यासाठी लोकांमध्ये या विषयी जनजागृती निर्माण करणे आवश्यक आहे, म्हणून दिनांक ११ ते १७ डिसेंबर हा कालावधी ''सिकलसेल नियंत्रण सप्ताह'' म्हणून घोषित करण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे.

सिकलसेल हा आजार आनुवंशिक आजार आहे. सिकलसेल ग्रस्त व्यक्तीला नियमित औषध उपचारांची गरज असते. सिकलसेल वाहक व्यक्ती बाह्यता निरोगी दिसते परंतु समाजात रुग्णांची संख्या वाढविण्यास ते कारणीभूत ठरू शकतात, म्हणून सर्वांनी जागरूक राहून सिकलसेल आजार संदर्भात काळजी घेतली पाहिजे, असे आवाहन आरोग्य विभागाच्या वतीने करण्यात येत आहे. या आजाराची लक्षणे ही अशक्तपणा, रक्तातील हिमोग्लोबिनचे प्रमाण कमी होणे, सांधे दुखी, सांधे सुजणे, शरीर पिवळसर होणे, असह्य वेदना होणे, लहान बालकांना वारंवार जंतु संसर्ग होणे, चेहरा निस्तेज दिसणे ही आहेत. या आजाराचे निदान शासकीय आरोग्य संस्थांमध्ये मोफत केले जाते. सर्व शासकीय आरोग्य संस्थेत सिकलसेलची तपासणी मोफत केली जाते. सिकलसेल वाहक व ग्रस्त रुग्णास मोफत समुपदेशन, औषधोपचार व संदर्भ सेवा उपलब्ध आहेत.

सिकलसेल हा आजार रक्तदोष आजार असून सिकल पेशी रक्तक्षय या नावाने ओळखला जातो. या आजारात लाल रक्त पेशींचा आकार विळ्यांसारखा होत असल्याने पेशींची लवचिकता कमी होते. यामुळे गुंतागुंत निर्माण होते. सिकलसेल पेशी आजारामुळे नेहमची होणारी गुंतागुंत म्हणजे रक्तक्षय (अनिमिया) या आजारावर वेळीच लग्नापूर्वी तपासणी केली तर पुढच्या पिढीला अनुवंशीकतेने होणाऱ्या या आजारापासून आपण वाचवू शकतो, म्हणून लग्न करण्यापूर्वी मुलगा-मुलगी दोघांनीही रक्ताची तपासणी करून घ्यावे, असे आवाहन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गंगाधर परगे यांनी केले आहे.

# पारनेरच्या नवनिर्वाचित आमदारांचे स्वातंत्र्य हिरावले - मनसे नेते पवार

**अक्षराज : राजकुमार इकडे**

**दि.१४, सुपा (अहिल्यानगर) :** पारनेर विधानसभा निवडणुकीत नवनिर्वाचित आमदारांना जनतेनं जनतेच्या सेवेसाठी मोठ्या विश्वासाने पारनेर - नगर तालुक्यातील भेडसावणाऱ्या समस्या सोडविण्यासाठी व प्रशासकीय पातळीवरील अनुभव पाहुन पारनेरच्या भविष्यासाठी जुना अनुभव पाहुन जनतेनं मतदान रुपी आशिर्वाद देऊन न्यायाची भूमिका पार पाडली. मिळालेल्या संधीचे सोने करणं ही नवनिर्वाचित लोकप्रतिनिधींची जबाबदारी आहे.

पारनेर तालुका विकासासह काही महत्वपूर्ण बाबित मांग पडला असून त्याची भर भरून काढण्याची जबाबदारी लोकप्रतिनिधींवर येऊन ठेपली आहे. त्यामुळे त्यांना स्वतंत्र काम करु देत त्यांच्या स्वातंत्र्यावर गदा आणू नये. स्वयंघोषित पुढार्यांचा राजकारणातील अतिरेक पणा घातक ठरू शकतो. याचा विचार आमदारांनी करणं आवश्यक आहे. नाहीतर मागचे दिवस पुढे यायला वेळ लागणार नाही. त्यामुळे आमदारांच्या पदाचा व ज्येष्ठत्वांचा सन्मान राखण्यासाठी स्वतः च्या स्वार्थासाठी जवळ आलेल्या स्वंयम घोषित पुढार्यांनी गरांडा करताना स्वतः च आत्मपरीक्षण करुन स्वतः ची उंची तपासणं गरजेचं आहे. तसेच पारनेर तालुक्याची ढासळलेली प्रतीमा उंचावण्यासाठी प्रयत्न करणं गरजेचं आहे.



पारनेरच्या भविष्यासाठी चांगल्या कामासाठी सन्माननीय श्री राज साहेब ठाकरे यांच्या विचारांवर महाराष्ट्र नवनिर्माण सेना लोकप्रतिनिधींच्या चांगल्या कामासाठी सोबत राहील परंतु चुकीचे काही आढळल्यास पारनेरच्या हितासाठी विरोध करायला पण मांग पुढे पाहणार नाही. चुकीला चुक बरोबर ला बरोबर म्हणण्याची महाराष्ट्र नवनिर्माण सेनेची भूमिका कायम राहील असे मत मनसे नेते अविनाश पवार यांनी व्यक्त केले.

# राष्ट्रीय किटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रम; दिल्लीच्या पथकाची आरोग्य शिबिराला भेट

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.१४, नेरूळ (नवी मुंबई) :** महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये हिवताप, डेंग्यू आजाराचा प्रसार रोखण्यासाठी आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्य विभागामार्फत विशेष शिबीरांचे आयोजन केले जात असून या शिबिरांना नागरिकांचा उत्तम प्रतिसाद लाभत आहे. शिबिरांना भेटी दिलेल्या नागरिकांमध्ये हिवताप व डेंग्यू आजारांबाबत प्रभावीपणे जनजागृती करण्यात आली.

राष्ट्रीय किटकजन्य रोगनियंत्रण कार्यक्रम, दिल्ली यांच्या संचालक डॉ.तनु जैन यांनी माँसाहेब मिनाताई ठाकरे रुग्णालय येथे भेट दिली असता हिवताप व डेंग्यू नियंत्रणाबाबत उपाययोजनांची पाहणी केली. त्यांच्यासोबत त्यांचे पथक आणि महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य सेवा, पुणे सहसंचालक डॉ.बबीता कमलापूकर, आरोग्य सेवा मुंबई मंडळ, ठाणे उपसंचालक डॉ.अशोक नांदापुरकर तसेच सहाय्यक संचालक, कोकण भवन डॉ.बाळासाहेब सोनावणे उपस्थित होते.

केंद्रीय पथकाने नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र, इंदिरानगर येथील आजच्या जनजागृती शिबिराला भेट दिली. शिबिरामध्ये घरातील व घराभोवतालील डासोत्पत्ती स्थानांची प्रात्यक्षिके बघून या नाविन्यपूर्ण शिबिराची प्रशंसा केली आणि देशातील इतर राज्यातही अशा प्रकारच्या शिबिरांचे आयोजन व्हावे या उद्देशाने त्याचे पूर्ण व्हिडीओ शूटिंग काढून घेतले. याप्रमाणे नमुंमपा कार्यक्षेत्रात जास्तीच जास्त नागरिकांपर्यंत पोहचून जनजागृती करण्यासाठी दि.१३ डिसेंबर रोजी २६ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांतर्गत विविध ठिकाणी जाहीर शिबीरांचे आयोजन करण्यात आले होते. सदर शिबिरांकरिता ९९८३ नागरिकांनी भेट दिली असून, १०४० रक्तनमुने घेण्यात आले.

नमुंमपा कार्यक्षेत्रात हिवताप, डेंग्यू आजाराबाबत जनजागृती करण्याकरिता दि.०३ ते १३ डिसेंबर या कालावधीत एकुण ३४२ जाहीर शिबीरांचे आयोजन करण्यात आले असून १४९८२६ नागरिकांनी या शिबिरांचा लाभ घेतला आहे. त्यामध्ये एकूण १३८१४ रक्त नमुने घेण्यात आले आहेत.

सदर शिबिरांमध्ये ॲनॉफीलीस व एडीस डासांची उत्पत्तीस्थाने प्रत्यक्षात दाखवून तसेच डासांच्या अळ्या प्रत्यक्ष दाखवून तसेच पाणी साठवून ठेवलेले ड्रम ओढणी, धोतर किंवा साडीच्या कपड्याने बंदिस्त करणे, त्याबरोबरच घराभोवती व घरांतर्गत असणारी डासोत्पत्ती



स्थानांची माहिती करून देणे, पाणी साठविण्याची भांडी व टाक्या बंदिस्त करणे, आठवड्यातून एक दिवस स्वच्छ करुन कोरड्या ठेवणे, भंगार साहित्य, टायर्स नष्ट करणे, छतावरील प्लास्टीक शिट, ताडपत्री यामध्ये पाणी साचू न देणे व ताप येताच त्वरित डॉक्टरांचा सल्ला घेणे याबाबत नागरीकांना प्रोत्साहित करुन आवाहन करण्यात येते. तरी आरोग्य विभागाच्या कार्यवाहीसोबतच नवी मुंबईकर नागरिकांनी घरातील व घराभोवतालची डासउत्पत्ती स्थाने नष्ट करणे तसेच आपले घर व परिसर स्वच्छ ठेवणे, आजुबाजूचा परिसर, टेरेस वरील भंगार नष्ट करणे आदी बाबींवर लक्ष दिले तर नवी मुंबईत हिवताप, डेंग्यू आजारावर आळा घालणे शक्य होईल असे आवाहन महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या वतीने करण्यात येत आहे.

# पादचारी दिनासाठी शहरातील चौकांमध्ये फक्त रंगरंगोटीच

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१४, पुणे :** लक्ष्मी रस्त्यावर 'पादचारी दिना'चा घाट घालण्यासाठी पुणे महापालिकेने ४७ लाख रुपये खर्चाची तरतूद केली खरे, पण याचे नेमके फलित काय, याबाबत अजूनही पुरेशी स्पष्टता आलेली नाही. लक्ष्मी रस्त्यावर या दिवशी वाहनमुक्ती असताना त्याला समांतर रस्ते कोंडीने ग्रासले आणि वाहनचालकच काय, पादचाऱ्यांनाही वाट काढणे मुश्किल झाले. अशा वेळी पादचाऱ्यांची सुरक्षितता, त्यांचा रस्त्यावर चालायचा हक्क याबाबत जनजागृती करण्याचा पालिकेचा उद्देश नक्की किती सफल झाला, याचे उत्तर नागरिक शोधत आहेत. लक्ष्मी रस्ता दिनांक ११ डिसेंबर २०२४ रोजी सकाळी ८ ते रात्री ८ या वेळात वाहनांसाठी बंद ठेवून केवळ पादचाऱ्यांसाठी खुला करण्यात आला होता. हा सुट्टीचा दिवस नसल्याने लक्ष्मी रस्ता परिसरातील शाळांत जाणाऱ्या विद्यार्थ्यांची गैरसोय होऊन सकाळीच वाहनमुक्त योजनेत शिथिलता आणावी लागून काही चौकांतून वाहतूक सुरू करावी लागली. लक्ष्मी रस्त्यावर वाहने आणायची नसल्याने या रस्त्यावरील दुकानांत कामे करणाऱ्यांची वाहने लावण्याची पंचाईत झाली. त्यातील अनेकांनी शेजारच्या गल्लीबोळांत वाहने लावल्याने तेथून चालणेही मुश्किल झाले. त्यात वाहतूक कोंडीची भर पडली, ती वेगळीच. त्या दिवशी, सकाळी आणि दुपारी फार कमी पादचारी लक्ष्मी रस्त्यावर आले.

त्यामुळे आजूबाजूच्या दुकानांना फायदा होण्याऐवजी उलाढाल मंदावल्याचा अनुभव आला. पुणे लक्ष्मी रस्त्यावर 'पादचारी दिना'चा घाट घालण्यासाठी पुणे महापालिकेने ४७ लाख रुपये खर्चाची तरतूद केली खरे, पण याचे नेमके फलित काय, याबाबत अजूनही पुरेशी स्पष्टता आलेली नाही. लक्ष्मी रस्त्यावर या दिवशी वाहनमुक्ती असताना त्याला समांतर रस्ते कोंडीने ग्रासले आणि वाहनचालकच काय, पादचाऱ्यांनाही वाट काढणे मुश्किल झाले. अशा वेळी पादचाऱ्यांची सुरक्षितता, त्यांचा रस्त्यावर चालायचा हक्क याबाबत जनजागृती करण्याचा पालिकेचा उद्देश नक्की किती सफल झाला, याचे उत्तर नागरिक शोधत आहेत. लक्ष्मी रस्ता बुधवारी सकाळी आठ ते रात्री आठ या वेळात वाहनांसाठी बंद ठेवून केवळ पादचाऱ्यांसाठी खुला करण्यात आला होता. हा सुट्टीचा दिवस नसल्याने लक्ष्मी रस्ता परिसरातील शाळांत जाणाऱ्या विद्यार्थ्यांची गैरसोय होऊन सकाळीच वाहनमुक्त योजनेत शिथिलता आणावी लागून काही चौकांतून वाहतूक सुरू करावी लागली.

लक्ष्मी रस्त्यावर वाहने आणायची नसल्याने या रस्त्यावरील दुकानांत कामे करणाऱ्यांची वाहने लावण्याची पंचाईत झाली. त्यातील अनेकांनी शेजारच्या गल्लीबोळांत वाहने लावल्याने तेथून चालणेही मुश्किल झाले. त्यात वाहतूक कोंडीची भर पडली, ती वेगळीच. त्या दिवशी, सकाळी आणि दुपारी फार कमी पादचारी लक्ष्मी रस्त्यावर आले. त्यामुळे आजूबाजूच्या दुकानांना फायदा होण्याऐवजी उलाढाल मंदावल्याचा अनुभव आला.

# थोडक्यात

## खोपोली नगरपरिषदेचे मुख्याधिकारी तथा प्रशासक डॉ.पाटील यांचे नागरिकांना आवाहन

**अक्षराज : मानसी कांबळे**

**दि.१४, खोपोली :** खोपोली नगर परिषदेने माझी वसुंधरा ४.०, स्वच्छ सर्वेक्षण, ओडीएफ (ODF) मध्ये सहभाग नोंदविला होता. त्यामध्ये नगर परिषदेने विभाग स्तरावर दुसरा क्रमांक व राज्य स्तरावर २३ वा क्रमांक मिळविला असून रक्कम ५० लाख रूपयांचे बक्षीस प्राप्त केले आहे.खोपोली नगर परिषदेचे माझी वसुंधरा ५.० मध्ये गुणांकन कसे वाढविता येईल, याकरीता खोपोली नगरपरिषदेस कोकण विभागीय आयुक्त डॉ.राजेश देशमुख, रायगड जिल्हाधिकारी किशन जावळे तसेच कोकण विभाग उपायुक्त गणेश शेटे यांच्या मार्गदर्शनाखाली स्वच्छ सर्वेक्षण कोकण विभाग तांत्रिक सल्लागार निनाद भागवत यांनी दिनांक १२ डिसेंबर व १३ डिसेंबर २०२४ या दिवशी प्रत्यक्ष भेट देवून खोपोली नगर परिषद हद्दीतील प्रत्यक्ष सर्वेक्षण करून खोपोली नगर परिषद गुणांकन वाढविण्यासाठी कोणत्या घटकांची अंमलबजावणी केल्यास विभाग स्तरावर तसेच राज्यस्तरावर माझी वसुंधरा ५.०, स्वच्छ सर्वेक्षण, ओडीएफमध्ये नगर परिषदेचा प्रथम क्रमांक कसा येईल यासाठी मार्गदर्शन केले. त्या अनुषंगाने खोपोली नगर परिषदेचे मुख्याधिकारी डॉ. पंकज पाटील यांनी नगर परिषदेचे अधिकारी, कर्मचारी यांना माझी वसुंधरा ५.०, स्वच्छ सर्वेक्षण, ओडीएफ अंतर्गत मार्गदर्शक सुचना केल्या. नविन हरित क्षेत्र निर्माण करणे, कचऱ्याचे ४ प्रकारात विलगीकरण करणे, मिया वॉकी फॉरेस्ट प्लान्टेशन करणे, नविन सायकल ट्रॅक निर्माण करणे, जलाशयांचे पुर्नवसन करणे, शहरात सोलर प्लॅन उभारून एलईडी लाईट लावणे, पाण्याच्या बचतीसाठी ठिबक सिंचन राबविणे, शहरात चौक सुशोभिकरण करणे. दरम्यान, या अनुषंगाने नागरिकांनी खोपोली नगर परिषदेस सहकार्य करावे, असे आवाहन मुख्याधिकारी डॉ.पंकज पाटील यांनी केले आहे.

## चिखली केंद्रस्तरीय हिवाळी क्रीडा स्पर्धेत मुंढर नं.१ शाळेचे चिखली केंद्रात वर्चस्व

**अक्षराज : उदय दणदणे**

**दि.१३, गुहागर (रत्नागिरी) :** गुहागर तालुक्यातील चिखली केंद्राच्या क्रीडा स्पर्धा चिखली मांडवकर वाडी येथे दिनांक १३ डिसेंबर २०२४ रोजी केंद्रीय प्रमुख विजय निकम सर यांच्या



अध्यक्षतेखाली पार पडल्या. या क्रीडा स्पर्धेत मुंढर नं.१ शाळेने सुयश संपादन केले. मोठा गट मुलगे कबड्डी व खोको अंतिम विजेता, मोठा गट मुली लंगडी, खोखो, कबड्डी अंतिम विजेता, लहान गट मुले कबड्डी, खोखो अंतिम विजेता, लहान गट मुली कबड्डी, लंगडी उपविजेता. ५० मीटर लहान गट मुली धावणे प्रथम क्रमांक दिक्षा भुसाल, १०० मीटर धावणे मुली ईश्वरी आग्रे प्रथम व स्नेहल गोणबरे द्वितीय क्रमांक, १०० मीटर धावणे मुलगे आर्य खांडेकर प्रथम क्रमांक, गौरव दमाई उंच उडी द्वितीय क्रमांक अशाप्रकारे यश मिळवून चिखली केंद्राच्या जनरल चॅम्पियन ट्रॉफीवर आपले नाव कोरले. सर्वच मुलांची बिट स्तरीय क्रीडा स्पर्धेसाठी निवड झाली. शाळेचे मुख्याध्यापक दशरथ कदम यांनी सर्व मुलांचे अभिनंदन आणि कौतुक केले.मार्गदर्शक शिक्षक वैभवकुमार पवार व लक्ष्मण पारवे यांचे ही अभिनंदन केले. शाळा व्यवस्थापन समिती व सर्व पालक बंधू भगिनी यांनी मुलांचे अभिनंदन व कौतुक केले.

## खासदार डॉ.सवरा यांनी घेतली केंद्रीय जलशक्ती मंत्री यांची भेट

**अक्षराज : प्रमोद मौळे**



**दि.१३, जव्हार (पालघर) :** पालघर लोकसभा कार्यसम्राट खासदार डॉ. हेमंत विष्णू सवरा यांनी हिवाळी अधिवेशना दरम्यान केंद्रीय जलशक्ती मंत्री ना. सी.आर. पाटील यांची दिल्ली येथे भेट घेतली. जल जीवन मिशन हा ग्रामीण भारतातील सर्व घरांना वैयक्तिक नळ कनेक्शनद्वारे सुरक्षित आणि पुरेसे पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्याचा आमच्या पंतप्रधानांचा ड्रीम प्रोजेक्ट आहे. माझ्या लोकसभा मतदारसंघतील पालघर जिल्हा दरवर्षी पाण्याच्या संकटाने त्रस्त आहे. पालघर जिल्ह्यातील अनेक भागात जल जीवन मिशनचे काम सुरू आहे. परंतु जिल्ह्यांतील काही भागांचा अद्याप ही जल जीवन मिशनमध्ये समावेश करण्यात आलेला नाही आणि जनता जलसंकटाने त्रस्त आहेत. पालघर जिल्ह्यातील जल जीवन मिशन योजनेतील राखडलेला निधी लवकरात लवकर उपलब्ध करून देण्यात यावा. तसेच पावसाचे पाणी नद्यान मध्ये येते आणी निघून जाते त्या करता कुठे ही पाण्याची अडवणूकीच साधन नाही. त्याकरिता चेक ड्याम बांधले पाहिजे. त्यामुळे जास्तीत जास्त वर्षभर पुरेल अशी वार्षिक उपयोजना केली. तसेच पालघर जिल्ह्यातील जल जीवन मिशन योजनेतील तक्रारी बद्दल विहीर पाण्याची कामतरता, पाईप लाईन व्येवस्तीत आतमध्ये न टाकता वर-वर टाकल्या गेल्या आहेत. अशा अधिकाऱ्यांना सूचना देऊन त्या व्यवस्थितपणे पूर्ण करून घेण्याकरिता सूचना केल्या आहे. पालघर जिल्ह्यातील जल जीवन मिशन योजनेतील बद्दल महत्वपूर्ण मुद्द्यांवर चर्चा केली. या सूचना निवेदनाच्या माध्यमातून केल्या. केंद्र सरकारच्या जन जीवन मिशन मार्फत घराघरात पाणी पोहचावे यासाठी मी प्रयत्नशील आहे.

## पूर्व द्रुतगती मार्गावर ट्रकवरून क्रेन कोसळली

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१४, मुंबई :** ट्रकमधून क्रेन घेऊन जात असताना लोखंडी साखळी तुटल्याने पूर्व द्रुतगती मार्गावर शनिवारी सकाळी क्रेन कोसळली. या अपघातात एक दुचाकी चालक गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर शीव रुग्णालयात उपचार सुरू आहेत. खड्डा खोदणारी मोठी क्रेन घेऊन अलिबाग येथून एक ट्रक निघाला होता. शनिवारी पहाटे पाचच्या सुमारास भांडुप येथे पूर्व द्रुतगती मार्गावरील घाटकोपर उड्डाणपूल उतरत असताना अचानक या क्रेनला बांधण्यात आलेली लोखंडी साखळी तुटली. त्यानंतर क्रेन ट्रकवरून खाली रस्तावर कोसळली.पहाटेच्या वेळी पूर्व द्रुतगती मार्गावर वाहनांची वर्दळ जास्त नव्हती. त्यामुळे मोठी दुर्घटना टळली आहे. मात्र या अपघात विपुल पांचाळ (४४) हा दुचाकी चालक गंभीर जखमी झाला आहे. दुचाकी चालकाच्या पायावर क्रेनचा काही भाग कोसळल्याने त्याचा पाय पूर्णपणे निकामी झाल्याची माहिती काही प्रत्यक्षदर्शींनी दिली आहे. दुचाकी चालकाला तत्काळ शीव रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्याच्यावर अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत. या अपघातानंतर पूर्व द्रुतगती मार्ग काही वेळ बंद करून वाहतूक जोड रस्त्यावरून वळवण्यात आली होती. त्यामुळे सकाळी मोठी वाहतूक कोंडी झाली होती.